अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ (ड ) व ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : २६-५-२००६.

श्री./ श्रीमती.........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ड ) व ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा बुधवार दिनांक ३१-५-२००६ रोजी सकाळी ११-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १.विषय पत्रिका व टिप्पणी.
२.कार्यालयीन प्रस्ताव.
३.नविन जकात दरसुची.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

बुधवार दि. ३१-५-२००६ रोजी सकाळी ११=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--÷÷--

१. अहमदनगर महानगरपालिकेचे जकातीचे नविन सुधारित दर व कर त्वरित लागु करणे बाबत मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद , सभापती , स्थायी समिती व मा. श्री. चव्हाण दिप नारायण , मा.श्री. चोपडा संजय फुलचंद मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंम्मतलाल , मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण , मा.श्री. बोरुडे अनिल वसंतराव ,स्थायी समिती सदस्य यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

२. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २६-५-२००६.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

बुधवार दि. ३१-५-२००६ रोजी सकाळी ११=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिकेचे जकातीचे नविन सुधारित दर व कर त्वरित लागु करणे बाबत मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद , सभापती , स्थायी समिती व मा. श्री. चव्हाण दिप नारायण , मा.श्री. चोपडा संजय फुलचंद मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंम्मतलाल , मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण , मा.श्री. बोरुडे अनिल वसंतराव ,स्थायी समिती सदस्य यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. | मंजुरीस शिफारस आहे. |
| २ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक : २६-५-२००६.
अहमदनगर

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दि.३१-५-२००६.

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिकेचे जकातीचे नविन सुधारीत दर व कर त्वरीत लागू करणेबाबत मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिंदानंद,सभापती,स्थायी समिती व मा.श्री.चव्हाण दिप नारायण, मा.श्री.चोपडा संजय फुलचंद ,मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंम्मतलाल,मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण,मा.श्री.बोरुडे अनिल वसंतराव,स्थायी समिती सदस्य यांचे पत्र व त्यावरील ऑफीस रिपोर्ट .

--*--

प्रस्तावाचा मजकुर :

**चर्चा -**

१) मा.श्री.अभय आगरकर - शहरे व उपनगरामध्ये पाणी पुरवठयाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे मी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. केडगांव व उपनगरे येथील नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या १५ दिवसांपासून पाणी कमी आहे. स्टेशन भागात ३-४ दिवसांनी तर केडगांव भागामध्ये ८-८ दिवसांनी पाणी येते. त्यावर आपण काहीही वक्तव्य करीत नाही. याकरीता शहरात १ दिवसाआड पाणीपुरवठा करावा. व पाणीपुरवठयाबाबत योग्य तो खुलासा करावा.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - पाणीपुरवठयाचा प्रश्न गंभीर आहे. शहरात रोज पाणी येत असले तरी प्रेशर फार कमी आहे. सावेडी भागात ४-४ तास पाणी येते. सर्वांना पाणी मिळावे परंतु आमचे पाणी कमी करु नये. शहरवासियांवर अन्याय करु नये.

३) मा.श्री.संदिप कोतकर - १ महिन्यापासून पाणीप्रश्न गंभीर झालेला आहे. टँकरने पाणीपुरवठयात गोंधळ निर्माण होतो. ज्यांचे घराजवळ टँकर उभा राहतो त्यांनाच पाणी मिळते.

४) मा.श्री.अंबादास गारुडकर - दरवर्षी पाणी टंचाईबाबत चर्चा होते. शहरात भरपूर पंरतु उपनगरात कमी हे चालूच आहे. केडगांव भागासाठी टाकीचे काम करावे. तरीही मोहीनीनगर भागासाठी टाकी होत नाही. हे काम झाले तर ब-याच अंशी पाणीप्रश्न सुटु शकेल. त्यावर ठोस कार्यवाही करावी.

मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, धरणाच्या पाण्याची पातळी कमी झाली असल्यामुळे ६० एमएलडी पाण्याऐवजी सध्या ४५ एमएलडी पाणी मिळते. त्यामुळे २५% पाणी कमी मिळत आहे. त्याचप्रमाणे २ दिवस वीज पुरवठयाच्या प्रश्नामुळे पाणीपुरवठा कमी होत आहे. आणखी एक मोटार बसवून पाणी उचलण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, तेथील मिटरच बंद आहे. ४३ एमएलडी पर्यंत पाणी मिळते. तसेच पाणीपुरवठयाचे २०० ते २५० टँकर चालतात. त्यामुळे पाणी कमी मिळत आहे. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, यावर बरेच नियंत्रण केले आहे. त्यावर मा.श्री.आगरकर यांनी सुचविले की, महानगरपालिकेचा डेव्हलपमेंट प्लॅन आलेला आहे. त्यामुळे व्यवस्थीत प्लॅनींग करुन पाण्याचा असमतोल आहे तो दूर करता येईल. तो दूर करावा. यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, आपण हे काम गिडॉन कंपनीला दिलेले होते. ते काम अपुरे आहे. पाणी टंचाई भागातील पाण्याचे वाटप नियोजनबध्द करण्याचा प्रयत्न करु. केडगांव भागासाठी नवीन पाईपलाईन टाकल्यानंतर केडगांवला पाणीपुरवठा करता येईल. यावर मा.आगरकरयांनीसांगितले की, १५ दिवसात परिस्थिती बदलली पाहिजे. त्यासाठी नियोजनबध्द

कार्यक्रम राबवावा. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, आयुक्त यांनी मिटींग लगेचच बोलवावी. पाणीप्रश्न गांभीर्याने दखल घ्यावी.

५) मा.श्री.संदीप कोतकर - मोहीनीनगरच्या टाकीचे काम त्वरीत चालु करावे. यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, याबाबत रिस्पॉन्स दिलेला नाही. त्याचेवर कारवाई करण्यात येईल.

६) मा.श्री.उडाणशिवे - पाणीप्रश्नाबाबत विचार व्हावा. शहरातील पाण्याच्या टाक्या होत नाहीत. ठेकेदारावर कारवाई करावी. दलितांचे पैशातूनच टाकी बांधायची हे बरोबर नाही. सर्वांना सारखा अधिकार असताना अन्याय का? प्रत्येक दलित वस्तीत १-१ टाकी बांधावी.

७) मा.श्री.दीप चव्हाण - पिंपळगांवचे कामाची सुरुवात झाली आहे. सदरचे काम कधी सुरु झाले. व कोणत्या स्टेजला आहे. त्यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, सदरचे काम आपण डिपार्टमेंटली करीत आहोत. या कामाचे इंजिनिअर श्री.निकम हे डॅमवर असल्याने उत्तरे देवू शकत नाही. सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे. यानंतर मा.आयुक्त यांनी सांगितले की, पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. मा.श्री.दीप चव्हाण यांनी विचारले की, याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचा सल्ला घेतला काय? सल्ला घेतला असता तर तांत्रिक प्रश्न उदभवला नसता. जबाबदार योग्य माणसाकडूनच काम करुन घेतले पाहिजे. सदरचे काम ७ महिन्यापासून चालू आहे. यावर मा.उपायुक्त यांनी सांगितले की, तांत्रिक मुदयासाठी श्री.ढेपे हे कार्यरत आहेत. तरी मग याला ६-६ महिने का लागतात असे मा.श्री.दीप चव्हाण यांनी विचारले. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, आपण हे काम लवकरच पूर्ण करुन घेउ. त्यावर मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले श्री.ढेपे यांचा फायदा होत नाही तर त्यांना कशाला ठेवले आहे. यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की सावेडी भुयारी गटारयोजना तसेच योग्य पाणीपुरवठा यासाठी श्री.ढेपे यांचा उपयोग होत आहे.

८) मा.श्री.शंकरराव घुले - पिंपळगांव जुनी पाईपलाईनचे काम अवघड झाले आहे. लाईन काढतेवेळी कर्मचा-यांना मारहाण झाली आहे. त्यांना संरक्षण दयावे.

९) मा.श्री.मुदस्सर शेख - मुकुंदनगर पाण्याच्या टाकीविषयी काल रोजी मंत्रालयात झालेल्या मिटींगमध्ये चर्चा झाली काय? यावर मा.उपायुक्त यांनी सागितले योजना लवकरच मार्गी लागेल.

**विषय क्र.१ बाबत झालेली चर्चा -**

१) मा.श्री.सतिश मैड - अभिकर्त्याचा रिपोर्ट आलेला आहे काय? त्यावर रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

२) मा.श्री.दीप चव्हाण - महापालिकेने जकात लावण्याचा निर्णय घेतला त्यामुळे शहरातील व्यापार संपुष्टात आला होता. त्यामुळे व्यापा-यांनी १९ दिवस बंद पुकारला. व जकातीचे दर कमी करण्याची मागणी केलेली होती. ठेका देउ नये तसेच जकात लावू नये अशीही मागणी केली. स्थायी समितीत ठेका नामंजूर झाला तर सर्व साधारण सभेमध्ये ठेका मंजूर झाला.

आता व्यापा-यांचे हित लक्षात घेउन स्थायी समितीने दर लावलेले आहेत. याबाबत आम्ही स्थायी समिती सदस्यांना विनंती केली होती. त्याचप्रमाणे प्रशासनालाही अडचणी होत्या. वाढलेले दर कमी करण्यात आले आहेत. त्याबद्दल सभागृहाचे आभार मानतो. व सर्वांनी दर कमी करण्यामध्ये सहकार्य केल्याबददल त्यांना धन्यवाद देतो. याबाबत शासनाने लगेच मान्यता दिली व २१ मे पासून शासनाचे पत्र होते. आता उशीर झालेला का असेना पण घेतलेला निर्णय योग्य आहे. सर्वांचेच आभार.

३) मा.श्री.शंकरराव घुले - जकातीच्या प्रश्नावर आंदोलने झाली. नगरपरिषदेची महानगरपालिका झाली. तथापी भाजप शिवसेना युतीने आश्वासन दिलेले होते. जकात लावणार नाही. परंतु शासनाने जकातीचे अनुदान बंद केल्यामुळे नाईलाजाने जकात लावावी लागली. जकातीमुळे शहरातील बाजारपेठ उध्वस्त होण्याच्या मार्गावर होती. दर कमी केल्यामुळे त्याची लवकर अंमलबजावणी करावी. पैसे जादा येत असतील तर ठेका पध्दतीस काय हरकत आहे.

४) मा.श्री.किशोर बोरा - अवास्तव जकात लागल्यामुळे व्यापा-यांनी बंद पुकारलेला होता. व्यापार उध्वस्त झालेला होता. तेव्हा या प्रश्नी जादा चर्चा न करता विषय मंजूर करावा व १ जून पासून नवीन दर लागु करावे.

५) मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी, सभापती स्थायी समिती - स्थायी समितीचे आभार मानतो तसेच या सभेचे आभार मानतो. १ जूनपासून हे दर लावण्यात यावेत.

६) मा.सौ.भागानगरे - १ जून पासून नवीन दर लागू करावेत.

७) मा.सौ.वर्षा आरीफ सय्यद - जकात प्रस्ताव मंजूर करुन १ जून पासून नवीन दर लागु करावेत.

८) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - प्रशासनाचे व सदस्यांचे अभिनंदन. १९ फेब्रुवारी २००६ चे सभेमध्ये १ एप्रिल २००६ पासून मंजूर लागु होतील असे वाटले होते. ८ महिन्यापासून व्यापा-यांचे हाल पाहिले असता आम्ही नगरसेवक त्यांचेबरोबर होतो. त्यांना सवलत मिळणार आहे ते आशेने आपल्याकडे पाहत आहेत. तेव्हा विषय मंजूर करावा.

९) मा.श्री.संजय चोपडा - मा.सदस्यांनी दिलेल्या यादीवरुन हा विषय सर्व साधारण सभेपुढे घेण्यात आला. त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करुन त्यांना धन्यवाद देतो. मा.श्री.दातरंगे यांचे खास अभिनंदन. तसेच मा.उपायुक्त श्री.देशमुख साहेब व इतर अधिकारी - कर्मचारी यांनी नेमून दिलेली माहिती वेळेत मेहनत घेउन प्रस्ताव सादर केला. शहरामध्ये व्यापार कमी झालेला होता. तालुक्यातील व्यापार वाढलेला होता.

१०) मा.श्री.आसाराम कावरे - व्यापार वाढला पाहिजे. उत्पन्न वाढले पाहिजे.

११) मा.श्री.सतीश मैड - नर्सरीच्या रोपावर जकात वसुल केली जाते. ती माफ करावी. महाराष्ट्र शासन झाडे लावा झाडे जगवा असे म्हणते. मग रोपांवर जकात का? अभिकर्त्याला नुकसान भरपाई का दयावयाची, अभिकर्त्यास तडीपार करावे. सर्वांना विश्वासात घेउन जकात विषय बंद करावा. जकात नष्ट करावी.

१२) मा.सौ.दिघे - १ जुन पासून सुधारीत दर लागु करावेत.

१३) मा.श्री.कृ.द.जाधव - वास्तविक आधीच अभ्यास केला असता तर ही वेळ आली नसती. आम्ही सुरुवातीपासून ठेका दयावयाच्या विरोधात आहोत. स्थायी समितीने ठेका नामंजूर केला होता. परंतु जनरल बोर्डाने मंजूर केला. सर्व सदस्य जकात विरोधी होते. जकातीच्या विरोधात व्यापा-यांनी १९ दिवस बंद केला. दर कमी व्हावयासच पाहिजे. अभिकर्ता आपण हटवू शकत नाही. कोर्ट कचे-या होतील. आता ४ महिने राहीलेले आहेत. अभिकर्त्यास नुकसान भरपाई दयावी लागली तर त्याची जबाबदारी नगरसेवक व सभागृहावर ठेवू नये. कायदेशीर बाबी स्वतः प्रशासनावर घेउन नवीन दर लागु करावेत व सर्व गोष्टी नियमात बसवून काम करावे.

१४) मा.श्री.संदीप कोतकर - दि.३० मे रोजी मुंबई येथे नामदार श्री.जयंत पाटील यांनी मनपाचे प्रश्नावर मिटींग बोलविली होती. याबाबत मा.नामदार जयंत पाटील यांचे अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा. त्याचप्रमाणे मा.आयुक्त, महानगरपालिका , मा.विनीत पाउलबुध्दे, मा.बाळासाहेब थोरात, मा.दादाभाउ कळमकर, मा.अरुण जगताप, मा.भानुदास कोतकर यांचे अभिनंदनाचा ठराव

करावा. व नवीन दर कर लगेच लागु करावेत. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, सर्व मंजूर झाल्यानंतर सत्कार करु.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - सुरुवातीलाच दर कर कमी करा असे आम्ही सांगत होतो. परंतु त्यावेळी व्यापा-यांनी जकात लागणार नाही अशा भरात होते. १९ दिवस बंद ठेवला. तरीही ठेकेदार नेमला. ठेकेदारबाबत तक्रारी आहेत. तरीही प्रशासनाने कार्यवाही केली नाही. पैसे घेउन ठेका दिला असे व्यापारी व नागरिकांमध्ये बोलले जात होते. त्यावेळी खुलासा केला नाही. जादा पारगमनबाबतही प्रशासनाने तपासणी केली परंतु काही कर्मचा-यांनीच त्यांना पूर्ण कल्पना दिली होती. त्यामुळे काही सापडले नाही.

व्यापारी व ठेकेदार दोघांचेही हित पाहिले पाहिजे. परंतु यामध्ये व्यापा-यांचे नांव करुन ठेकेदाराचे हित पाहिले जात आहे हे बरोबर नाही. नुकसानीचा जो तक्ता दाखवला त्यामध्ये ४०% दाखवले ते योग्य नाही. तुटीबरोबरच वाढ का दाखवली नाही. २७ लाख लिटर डिझेल येते ते ८ लाख लिटर्स आहे. दर कमी केल्यामुळे आवक वाढेल त्यामुळे वाढणारे उत्पन्न का गृहीत धरले नाही. हे सर्व ठेकेदाराचे हितासाठी प्रशासनाने केले आहे. तक्त्यामध्ये काहीही बदल केलेला नाही. बैठकही ज्या दिवशी झाली त्याच दिवशी ठेकेदाराने तक्ता दिला.

नोव्हेंबर ०५ मध्ये झालेल्या सर्वेप्रमाणे भाजीपाला व दुधापोटी उत्पन्न २६ लक्ष होते असा तक्ता मनपाने मला दिला आहे. आता ८१ लक्ष कसे झाले? जकात अभिकर्त्यास दिलेल्या सुटीबाबत माझा विरोध आहे. (याबाबतचे पत्र वाचून दाखवले) भाजीपाला व दुधावरील ८१ लाखाची सुट देणे योग्य नाही. यास माझा विरोध आहे.

मा.आयुक्त यांनी यावर खुलासा केला की, सर्व वस्तुस्थितीचा विचार करुनच कर्मचा-यांमार्फत अभ्यास करुन रक्कम काढलेली आहे. ४ महिन्यातही उत्पन्न कमी होउ शकते. हा प्रस्ताव आहे. तो तुमच्यापुढे ठेवला आहे.

यावर मा.गिरवले यांनी सांगितले की, दुध व भाजीपाला यावर ८१ लाख कबुल केले आहेत. त्याला लेखी नाही ठराव नाही, कशाला देता. सर्व पदाधिकारी यांच्या भूमिकेमुळे कमी करतो असे तो म्हणाला आहे.

मा.आयुक्त यांनी यावर खुलासा केला की दर पत्रकात दर मंजूर आहेत. त्याचे उत्पन्न गृहीत धरुन ठेका भरलेला होता. ठरावात पारगमनचे दर वाढवावेत असे ठरले होते. यावर मा.गिरवले यांनी ८१.९० लाख कशाचे आधारे ठरवले असे विचारले. यावर मा.आयुक्त यांनी सर्व्हे केल्याचे सांगितले. यावर मा.गिरवले यांनी सांगितले सर्व्हेसाठी ६० कर्मचारी नेमले होते. १० दिवसाचे माहितीमध्ये दुधावर ३१ लाख व भाजीपाला यावर ४ लाख असे एकूण ३५ लाख जकात गृहीत धरली होती. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, ऑफिस अभिलेख आपण पाहू शकता. दुधाचा खप हॉटेल यांचा वापर याचा सर्व विचार करुन सर्व्हे केला आहे.

१६) मा.श्री.अभय आगरकर - २५% वाढ करुन दयावी असा प्रस्ताव मी मांडला होता. येणारी तुट दुध भाजीपाला जकात माफ होती. १५ ते २०% वाढवून दयावे असे ठरले होते. हा कम्युनिकेशन गॅप आहे संभ्रम आहे. निर्णय घेताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे आवश्यक होते. तसे न झाल्यास संशयाचे वातावरण निर्माण होते. यापुढे असे प्रकार घडू नयेत. दोन्ही सर्व्हे मधील परिस्थितीत झालेल्या बदलाबाबत प्रसिध्दी देणे आवश्यक होते. १ जुन पासून सुधारीत दर लागु करण्यात यावेत.

जकात अधिक्षक यांनी खुलासा केला की, जकात अभिकर्त्याने केलेला सर्व्हे मान्य नव्हता. म्हणून त्यामुळे पुन्हा सर्व बाजूने विचार करुन सर्व्हे करण्यात आला.

१७) मा.श्री.कैलास गिरवले - व्यापा-यांना पुढे करुन ठेकेदाराचे हित पाहिले. कमी करावयाच्या रकमेबाबत माझा विरोध आहे.

१८) मा.श्री.शंकरराव घुले - आरोप प्रत्यारोप होताना काही गोष्टी खटकतात. झाडे लावा झ ाडे जगवा महाराष्ट्र शासनाचे आदेश असताना जकात माफ व्हावयास पाहिजे होती. परंतु रोपांचा व्यवहार होत असेल तर जकात लावावयासच पाहिजे. ठेकेदाराने पैसे वाटले हे सुध्दा म्हणणे चुकीचे आहे. मा.महापौर यांनी खुलासा केला की, झालेले आरोप चुकीचे आहेत. ३३ कोटीचे टेंडर ४०.४१ कोटीला गेले. त्यात महानगरपालिकेचा फायदाच आहे. यानंतर मा.घुले यांनी सांगितले पाणीपट्टी घरपट्टी ठराव मांडला असता तो का मान्य केला नाही? तुटीविषयी प्रशासन फकत भूमिका मांडते. आपण ठराव करतो. प्रशासन नाही. ८-११ ला मांडलेल्या प्रस्तावात मा.गिरवले यांनी भाषण केले होते. त्यातही शेतक-यांच्या माफीचा ठराव मांडला होता. त्यावर मा.गिरवले यांनी सांगितले हा ठराव अंमलात आणलेला नाही. मा.महापौर यांनी सांगितले या ठरावाचे मा.आयुक्तांनी पालन केले नाही.

यावर मा.घुले यांनी सांगितले की, नगरपालिका जकात वसुल करत असताना अनेक टोळया तयार झालेल्या होत्या. नगरसेवकासह काही लोक त्यात सामील होते. त्यावेळी नगरसेवकांनी नाके वाटून घेतलेले होते. आता ठेका दिलेला आहे. हे चांगले काम झाले आहे. शहराची बाजारपेठ यापुढेही कार्यरत रहाण्यासाठी या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

१९) मा.श्री.सुरेश शेळके - प्रशासनाने मांडलेला विषय मंजूर. या सभेत प्रस्ताव प्रोसिडींग कायम करण्यात यावे.

२०) मा.श्री.चोपडा - मा.शेळके यांनी मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन देतो.

२१) मा.श्री.नितीन जगताप - या ठरावास आम्ही मंजुरी दिली आहे. पण मा.आयुक्तांचे काय म्हणणे आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, सदरचा प्रस्ताव कार्यालयाने मांडलेला आहे. त्यास सहमती आहे.

२२) मा.श्री.अभय आगरकर - मनपाने सर्व्हे केल्यानंतर पहिल्या सर्व्हेतील त्रुटी भरुन काढल्या असत्या तर बरे झाले असते. जे उत्पन्न धरले त्यात निगोशिएशन होत असेल तर त्यात काही अडचण आहे काय हे पाहिले काय? त्यावर मा.आयुक्त यांनी सांगितले पूर्ण प्रस्ताव अभ्यास करुन मांडला आहे.

शेवटी मा.महापौर यांनी सांगितले की, सर्व सदस्यांनी अभ्यास करुन या प्रस्तावावर मुद्दे मांडले आहेत. ३३ कोटीचा ठेका ४०.४१ कोटीला गेला होता. त्यात महानगरपालिकेचे हितच पाहिले गेले. त्यामध्ये वेळीवेळी आलेले वाईट अनुभव आम्ही मा.आयुक्त यांच्या कानावर घातले. तथापी जादा दर असल्यामूळे सर्व जण तक्रारी करीत होते. पैशाअभावी कामे होत नव्हती. इतर मनपाचे तुलनेत आपण मंजूर केलेले दर शासनाने मंजूर केलेले होते. आताही जे दर ठरविण्यात आले आहेत ते मंजूर करुन उदयापासून दर आकारण्याची मंजुरी दयावी अशी विनंती केली. यावर मा.आयुक्त यांनी सदरबाबतचा अंतिम ठराव त्वरीत मिळाल्यास त्याची अंमलबजावणी आज रात्रीपासून केली जाईल, असे सांगितले. त्याचप्रमाणे सदरच्या विषयाचे इतिवृत्त याच सभेत कायम करण्यात येत आहे. असे मा.महापौर यांनी सांगितले व त्यानंतर चर्चा समाप्त झाली.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : ३१-५-२००६.

.............................................................................................................

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेचे जकातीचे नविन सुधारित दर व कर त्वरित लागु करणे बाबत मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद , सभापती , स्थायी समिती व मा. श्री. चव्हाण दिप नारायण , मा.श्री. चोपडा संजय फुलचंद मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंम्मतलाल , मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण , मा.श्री. बोरुडे अनिल वसंतराव ,स्थायी समिती सदस्य यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

**प्रस्तावाचा मजकुर :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये जकात नियम मंजूर करुन दिनांक २७-८-२००५ पासून प्रत्यक्ष जकात वसुल केली जात आहे. जकात वसुलीकामी दिनांक १-१०-२००५ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी श्री साई एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांची वार्षिक देकार रक्कम रु.४० कोटी ४१ लाख मान्य करुन अभिकर्ता म्हणून नेमणूक केली आहे.

जकात नियमातील अन्य महानगरपालिकेच्या तुलनेने असलेले जादा दर आणि अचानक जकात लागु झाल्याने व्यापारी पेठेवर नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याने माहे नोव्हेंबर व डिसेंबर २००५ मध्ये व्यापार बंदचे आंदोलन करण्यात आले होते. हा बंद मागे घेण्यासाठी महानगरपालिकेच्या व मा.शासनाच्या स्तरावर तसेच मा.वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा आणि मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांचेसमोर झ ाालेल्या वेळोवेळीच्या बैठकीमध्ये महानगरपालिकेने जकाती संदर्भात उचित ठोस पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आले होते.

त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरावर अभ्यास समिती गठीत करुन अभ्यास समितीच्या अहवालानुसार मा.स्थायी समिती व महासभेसमोर निर्णय घेउन दिनांक २०-२-२००६ च्या अंदाजपत्रकासोबत दर सुधारणेच्या नियमांना मंजुरी देण्यात आली आहे. या मंजूर नियमांना मा.शासनाने शासन निर्णय क्र.अमपा १००६/३३२/प्र.क्र.११२/२००६/ नवि - २४ दि.२०-४-२००६ अन्वये मा.शासनाने मान्यता दिली असून या आदेशात " सदरील जकात नियम या मंजूरी आदेशाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या कालावधीनंतर म्हणजेच

दिनांक २१ मे २००६ पासून अंमलात आणण्यासाठी महानगरपालिका सक्षम राहील " असे नमूद करण्यात आले आहे.

महासभेपुढे विषय ठेवताना त्याचप्रमाणे शासनाकडे नियम मंजुरीसाठी सादर करताना नव्याने मंजुर केलेले दर अभिकर्त्याच्या कालावधीमध्ये लागु करावयाचे झाल्यास अभिकर्त्याशी सहमतीचा करार करावा लागेल. ही बाब वेळोवेळी निदर्शनास आणून देण्यात आली होती.

व्यापारी वर्गाकडून नवीन दर लागु करणेबाबत वारंवार होणारी मागणी त्याचप्रमाणे मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते तसेच अन्य पदाधिकारी व विविध गटांचे नेते यांचेकडूनही नवीन दर त्वरीत लागु करणेबाबत मागणी होत आहे. त्यामुळे पदाधिकारी, अधिकारी व अभिकर्त्याचा प्रतिनिधी यांचेसमवेत दि.११ मे २००६ रोजी बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये अभिकर्ता यांनी जकात करापोटी मिळणा-या उत्पन्नात नवीन दरानुसार ४०% तुट येत असून पारगमन पासच्या दर वाढीमुळे मिळणारी रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम दिल्यास तसेच दुध भाजीपाल्याच्या जकातीपोटी रु.१ कोटी ५० लाख देकार रकमेमधून कमी केल्यास सहमतीचा करार करण्याची तयारी दर्शविली. तथापी ४०% घट सिध्द करण्यासाठी उपलब्ध कागदपत्रावर समाधान न झाल्यामुळे माहे एप्रिल २००६ मधील प्रत्यक्ष जकात वसुलीची पावतीपुस्तके तपासून प्रत्यक्षात होणा-या घटीची टक्केवारी निश्चित करणेसाठी जकात अधिक्षकांना निर्देश देण्यात आले होते.

त्यामुळे अतिरिक्त ६० कर्मचारी यांची नेमणूक करुन एकूण १९ जकात नाक्यांच्या प्रत्यक्ष जकात व नवीन दराने होणारी जकात यातील तूट काढण्यात आली. (सोबत तक्ता जोडला आहे.) त्यानुसार प्रत्यक्षात ३९.४४% इतकी आहे. तुट येण्यासाठी विशेष करुन जिवनावश्यक वस्तु तेल, तुप, साखर, मिरची, पेट्रोल, डिझेल, गॅस, औषधे इत्यादी विविध वस्तुवरील कमी झालेले जकातीचे दर कारणीभूत झाले आहेत. (सोबत कमी झालेल्या दराचा तक्ता)

वरीलप्रमाणे तपशील उपलब्ध झाल्याने दि.२५-५-२००६ रोजी अभिकर्त्याचे प्रतिनिधी श्री.जयकुमार गोरे यांना मा.आयुक्त साहेब, यांचे दालनात बैठकीसाठी बोलविण्यात आले होते.

या बैठकीच्या वेळी दुध व भाजीपाल्याच्या जकातीच्या बदल्यात वार्षिक रक्कम रु.८१ लाख ९० हजार वर तडजोड करण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे ते किमान देकार रकमेपेक्षा भरलेली जादाची रक्कम विचारात घेवून नवीन दर लागू केल्याने जकातीच्या उत्पन्नात ४५% घट धरण्याची मागणी केली. तथापी सर्वेक्षणात ३९.४४% एवढी तुट आल्याने मा.आयुक्त साहेब यांनी या टक्केवारीवर तडजोड करण्याचे सुचित केले. चर्चेअंती जकातीच्या उत्पन्नात ४०% तुट भरुन पारगमन पासच्या वाढीव दरामुळे होणारे वाढीव उत्पन्न वजा जाता उर्वरित तुट अभिकर्त्यास तडजोडीच्या स्वरुपात देकार रक्कमेतून कमी करण्याचे चर्चेअंती निश्चित झाले.

वरीलप्रमाणे संमतीदर्शक प्रस्ताव तात्काळ दाखल करण्याचे अभिकर्ता यांना सुचित केले आहे.

चर्चेनुसार खालीलप्रमाणे तुटीची परिगणना केली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | वार्षिक देकार रक्कम | ४०,४१,००,०००/- |
| २ | प्रत्येक हप्त्यामध्ये भरावयाची रक्कम | ८०,८२,०००/- |
| ३ | प्रती दिन भरणा करावयाची रक्कम | ११,५४,५७१/- |
| ४ | यापैकी पारगमन पासची रक्कम (प्रति दिन ५५०० वाहने गृहीत धरुन) | १,१०,०००/- |
| ५ | दररोजची जकातीची रक्कम | १०,४४,५७१/- |
| ६ | १ मे २००६ ते ३०-९-२००६ (१२२ दिवस) या कालावधीतील जकात | १२,७४,३७,६६२/- |
| ७ | वरील कालावधीमधील संभाव्य जकात तुट | ५,०९,७५,०६५/- |
| ८ | पारगमन पासमध्ये वाढीव दरामुळे होणारी उत्पन्नातील वाढ (प्रति दिन)<br>अ) ४३०० x (६०-२०=४०)<br>ब) १२०० x (१०० - २० = ८०) | <br><br>१,७२,०००/-<br>+ ९६,०००/-<br>२,६८,०००/- |
| ९ | वरील कालावधीमधील १२२ दिवसांसाठी संभाव्य वाढ २,६८,००० x १२२ | ३,२६,९६,०००/- |
| १० | निव्वळ येणारी तुट | १,८२,७९,०६५/- |

वरील परिगणना करताना जकातीच्या उत्पन्नात दुध व भाजीपाल्याचे उत्पन्न गृहीत धरण्यात आलेले आहे. त्यामुळे वार्षिक दुध व भाजीपाल्याच्या जकातीपोटी संपूर्ण रक्कम

रु.८१,९०,०००/- मुळ देकार रकमेतून वजा करुन उर्वरित रकमेमधून दुध व भाजीपाल्याच्या ४ महिन्यातील रक्कम रु.२७,३०,०००/- वजा करुन अभिकर्त्यास रु.१,५५,४९,०६५/- एवढी रक्कम तुटीपैकी देकार रकमेतून वजा करावी लागेल.

सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने दि.१-६-२००६ पासुन लागु करणेचा सदरचा प्रस्ताव निर्णय घेण्यासाठी मा.सभेपुढे सादर करणेविषयी आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, जकात अधिक्षक यांचेकडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त ( सा ) यांचा अभिप्राय की, अहवालानुसार कार्यवाही करणे हरकतीचे नाही. या कार्यवाहीमुळे अभिकर्त्याचे साप्ताहिक भरावयाच्या हप्त्याच्या रकमेत अनुषंगिक बदल होतील. तरी प्रस्ताव मा.महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करणेसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साो.यांचा अभिप्राय की, प्रस्तावाशी सहमत.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मुख्य लेखा परिक्षक , मा. उपायुक्त ( सा ) व मा.आयुक्त साो. यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयासाठी मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा -**

१) मा.श्री.अभय आगरकर - शहरे व उपनगरामध्ये पाणी पुरवठयाचा प्रश्न निर्माण झ ाालेला आहे. त्यामुळे मी  हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. केडगांव व उपनगरे येथील नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या १५ दिवसांपासून पाणी कमी आहे. स्टेशन भागात ३-४ दिवसांनी तर केडगांव भागामध्ये ८-८ दिवसांनी पाणी येते. त्यावर आपण काहीही वक्तव्य करीत नाही. याकरीता शहरात १ दिवसाआड पाणीपुरवठा करावा. व पाणीपुरवठयाबाबत योग्य तो खुलासा करावा.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - पाणीपुरवठयाचा प्रश्न गंभीर आहे. शहरात रोज पाणी येत असले तरी प्रेशर फार कमी आहे. सावेडी भागात ४-४ तास पाणी येते. सर्वांना पाणी मिळावे परंतु आमचे पाणी कमी करु नये. शहरवासियांवर अन्याय करु नये.

३) मा.श्री.संदिप कोतकर - १ महिन्यापासून पाणीप्रश्न गंभीर झालेला आहे. टँकरने पाणीपुरवठयात गोंधळ निर्माण होतो. ज्यांचे घराजवळ टँकर उभा राहतो त्यांनाच पाणी मिळते.

४) मा.श्री.अंबादास गारुडकर - दरवर्षी पाणी टंचाईबाबत चर्चा होते. शहरात भरपूर परंतु उपनगरात कमी हे चालूच आहे. केडगांव भागासाठी टाकीचे काम करावे. तरीही

मोहीनीनगर भागासाठी टाकी होत नाही. हे काम झाले तर ब-याच अंशी पाणीप्रश्न सुटु शकेल. त्यावर ठोस कार्यवाही करावी.

मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, धरणाच्या पाण्याची पातळी कमी झाली असल्यामुळे ६० एमएलडी पाण्याऐवजी सध्या ४५ एमएलडी पाणी मिळते. त्यामुळे २५% पाणी कमी मिळत आहे. त्याचप्रमाणे २ दिवस वीज पुरवठयाच्या प्रश्नामुळे पाणीपुरवठा कमी होत आहे. आणखी एक मोटार बसवून पाणी उचलण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यावर मा.श्री.आगरकर यांनी सांगितले की, तेथील मिटरच बंद आहे. ४३ एमएलडी पर्यंत पाणी मिळते. तसेच पाणीपुरवठयाचे २०० ते २५० टँकर चालतात. त्यामुळे पाणी कमी मिळत आहे. यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, यावर बरेच नियंत्रण केले आहे. त्यावर मा.श्री.आगरकर यांनी सुचविले की, महानगरपालिकेचा डेव्हलपमेंट प्लॅन आलेला आहे. त्यामुळे व्यवस्थीत प्लॅनींग करुन पाण्याचा असमतोल आहे तो दूर करता येईल. तो दूर करावा. यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, आपण हे काम गिडॉन कंपनीला दिलेले होते. ते काम अपुरे आहे. पाणी टंचाई भागातील पाण्याचे वाटप नियोजनबध्द करण्याचा प्रयत्न करु. केडगांव भागासाठी नवीन पाईपलाईन टाकल्यानंतर केडगांवला पाणीपुरवठा करता येईल. यावर मा.आगरकरयांनीसांगितले की, १५ दिवसात परिस्थिती बदलली पाहिजे. त्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रम राबवावा. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, आयुक्त यांनी मिटींग लगेचच बोलवावी. पाणीप्रश्न गांभीर्याने दखल घ्यावी.

५) मा.श्री.संदीप कोतकर - मोहीनीनगरच्या टाकीचे काम त्वरीत चालु करावे. यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की, याबाबत रिस्पॉन्स दिलेला नाही. त्याचेवर कारवाई करण्यात येईल.

६) मा.श्री.उडाणशिवे - पाणीप्रश्नाबाबत विचार व्हावा. शहरातील पाण्याच्या टाक्या होत नाहीत. ठेकेदारावर कारवाई करावी. दलितांचे पैशातूनच टाकी बांधायची हे बरोबर नाही. सर्वांना सारखा अधिकार असताना अन्याय का? प्रत्येक दलित वस्तीत १-१ टाकी बांधावी.

७) मा.श्री.दीप चव्हाण - पिंपळगांवचे कामाची सुरुवात झाली आहे. सदरचे काम कधी सुरु झाले. व कोणत्या स्टेजला आहे. त्यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की, सदरचे काम आपण डिपार्टमेंटली करीत आहोत. या कामाचे इंजिनिअर श्री.निकम हे डॅमवर असल्याने उत्तरे देवू शकत नाही. सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे. यानंतर मा.आयुक्त यांनी सांगितले की, पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले आहे. मा.श्री.दीप चव्हाण यांनी विचारले की, याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचा सल्ला घेतला काय? सल्ला घेतला असता तर तांत्रिक प्रश्न उदभवला नसता. जबाबदार योग्य माणसाकडूनच काम करुन घेतले पाहिजे. सदरचे काम ७ महिन्यापासून चालू आहे. यावर मा.उपायुक्त यांनी सांगितले की, तांत्रिक मुदयासाठी श्री.ढेपे हे कार्यरत आहेत. तरी मग याला ६-६ महिने का लागतात असे मा.श्री.दीप चव्हाण यांनी विचारले. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, आपण हे काम लवकरच पूर्ण करुन घेउ. त्यावर मा.श्री.दीप चव्हाण यांनी सांगितले श्री.ढेपे यांचा फायदा होत नाही तर त्यांना कशाला ठेवले आहे. यावर मा.आयुक्त यांनी सांगितले की सावेडी भुयारी गटारयोजना तसेच योग्य पाणीपुरवठा यासाठी श्री.ढेपे यांचा उपयोग होत आहे.

८) मा.श्री.शंकरराव घुले - पिंपळगांव जुनी पाईपलाईनचे काम अवघड झाले आहे. लाईन काढतेवेळी कर्मचा-यांना मारहाण झाली आहे. त्यांना संरक्षण दयावे.

९) मा.श्री.मुदस्सर शेख - मुकुंदनगर पाण्याच्या टाकीविषयी काल रोजी मंत्रालयात झालेल्या मिटींगमध्ये चर्चा झाली काय? यावर मा.उपायुक्त यांनी सागितले योजना लवकरच मार्गी लागेल.

**विषय क्र.१ बाबत झालेली चर्चा -**

१) मा.श्री.सतिश मैड - अभिकर्त्याचा रिपोर्ट आलेला आहे काय? त्यावर रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

२) मा.श्री.दीप चव्हाण - महापालिकेने जकात लावण्याचा निर्णय घेतला त्यामुळे शहरातील व्यापार संपुष्टात आला होता. त्यामुळे व्यापा-यांनी १९ दिवस बंद पुकारला. व जकातीचे दर कमी करण्याची मागणी केलेली होती. ठेका देउ नये तसेच जकात लावू नये अशीही मागणी केली. स्थायी समितीत ठेका नामंजूर झाला तर सर्व साधारण सभेमध्ये ठेका मंजूर झाला.

आता व्यापा-यांचे हित लक्षात घेउन स्थायी समितीने दर लावलेले आहेत. याबाबत आम्ही स्थायी समिती सदस्यांना विनंती केली होती. त्याचप्रमाणे प्रशासनालाही अडचणी होत्या. वाढलेले दर कमी करण्यात आले आहेत. त्याबद्दल सभागृहाचे आभार मानतो. व सर्वांनी दर कमी करण्यामध्ये सहकार्य केल्याबददल त्यांना धन्यवाद देतो. याबाबत शासनाने लगेच मान्यता दिली व २१ मे पासून शासनाचे पत्र होते. आता उशीर झालेला का असेना पण घेतलेला निर्णय योग्य आहे. सर्वांचेच आभार.

३) मा.श्री.शंकरराव घुले - जकातीच्या प्रश्नावर आंदोलने झाली. नगरपरिषदेची महानगरपालिका झाली. तथापी भाजप शिवसेना युतीने आश्वासन दिलेले होते. जकात लावणार नाही. परंतु शासनाने जकातीचे अनुदान बंद केल्यामुळे नाईलाजाने जकात लावावी लागली. जकातीमुळे शहरातील बाजारपेठ उध्वस्त होण्याच्या मार्गावर होती. दर कमी केल्यामुळे त्याची लवकर अंमलबजावणी करावी. पैसे जादा येत असतील तर ठेका पध्दतीस काय हरकत आहे.

४) मा.श्री.किशोर बोरा - अवास्तव जकात लागल्यामुळे व्यापा-यांनी बंद पुकारलेला होता. व्यापार उध्वस्त झालेला होता. तेव्हा या प्रश्नी जादा चर्चा न करता विषय मंजूर करावा व १ जून पासून नवीन दर लागु करावे.

५) मा.श्री.नरेंद्र कुलकर्णी, सभापती स्थायी समिती - स्थायी समितीचे आभार मानतो तसेच या सभेचे आभार मानतो. १ जूनपासून हे दर लावण्यात यावेत.

६) मा.सौ.भागानगरे - १ जून पासून नवीन दर लागू करावेत.

७) मा.सौ.वर्षा आरीफ सय्यद - जकात प्रस्ताव मंजूर करुन १ जून पासून नवीन दर लागु करावेत.

८) मा.श्री.सुनिल त्रिपाठी - प्रशासनाचे व सदस्यांचे अभिनंदन. १९ फेब्रुवारी २००६ चे सभेमध्ये १ एप्रिल २००६ पासून मंजूर लागु होतील असे वाटले होते. ८ महिन्यापासून व्यापा-यांचे हाल पाहिले असता आम्ही नगरसेवक त्यांचेबरोबर होतो. त्यांना सवलत मिळणार आहे ते आशेने आपल्याकडे पाहत आहेत. तेव्हा विषय मंजूर करावा.

९) मा.श्री.संजय चोपडा - मा.सदस्यांनी दिलेल्या यादीवरुन हा विषय सर्व साधारण सभेपुढे घेण्यात आला. त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करुन त्यांना धन्यवाद देतो. मा.श्री.दातरंगे यांचे खास अभिनंदन. तसेच मा.उपायुक्त श्री.देशमुख साहेब व इतर अधिकारी - कर्मचारी यांनी नेमून दिलेली माहिती वेळेत मेहनत घेउन प्रस्ताव सादर केला. शहरामध्ये व्यापार कमी झालेला होता. तालुक्यातील व्यापार वाढलेला होता.

१०) मा.श्री.आसाराम कावरे - व्यापार वाढला पाहिजे. उत्पन्न वाढले पाहिजे.

११) मा.श्री.सतीश मैड - नर्सरीच्या रोपावर जकात वसुल केली जाते. ती माफ करावी. महाराष्ट्र शासन झाडे लावा झाडे जगवा असे म्हणते. मग रोपांवर जकात का? अभिकर्त्याला नुकसान भरपाई का दयावयाची, अभिकर्त्यास तडीपार करावे. सर्वांना विश्वासात घेउन जकात विषय बंद करावा. जकात नष्ट करावी.

१२) मा.सौ.दिघे - १ जुन पासून सुधारीत दर लागु करावेत.

१३) मा.श्री.कृ.द.जाधव - वास्तविक आधीच अभ्यास केला असता तर ही वेळ आली नसती. आम्ही सुरुवातीपासून ठेका दयावयाच्या विरोधात आहोत. स्थायी समितीने ठेका नामंजूर केला होता. परंतु जनरल बोर्डाने मंजूर केला. सर्व सदस्य जकात विरोधी होते. जकातीच्या विरोधात व्यापा-यांनी १९ दिवस बंद केला. दर कमी व्हावयासच पाहिजे.
अभिकर्ता आपण हटवू शकत नाही. कोर्ट कचे-या होतील. आता ४ महिने राहीलेले आहेत. अभिकर्त्यास नुकसान भरपाई दयावी लागली तर त्याची जबाबदारी नगरसेवक व सभागृहावर ठेवू नये. कायदेशीर बाबी स्वतः प्रशासनावर घेउन नवीन दर लागु करावेत व सर्व गोष्टी नियमात बसवून काम करावे.

१४) मा.श्री.संदीप कोतकर - दि.३० मे रोजी मुंबई येथे नामदार श्री.जयंत पाटील यांनी मनपाचे प्रश्नावर मिटींग बोलविली होती. याबाबत मा.नामदार जयंत पाटील यांचे अभिनंदनाचा ठराव मंजूर करावा. त्याचप्रमाणे मा.आयुक्त, महानगरपालिका , मा.विनीत पाउलबुध्दे, मा.बाळासाहेब थोरात, मा.दादाभाउ कळमकर, मा.अरुण जगताप, मा.भानुदास कोतकर यांचे अभिनंदनाचा ठराव करावा. व नवीन दर कर लगेच लागु करावेत. यावर मा.महापौर यांनी सांगितले की, सर्व मंजूर झाल्यानंतर सत्कार करु.

१५) मा.श्री.कैलास गिरवले - सुरुवातीलाच दर कर कमी करा असे आम्ही सांगत होतो. परंतु त्यावेळी व्यापा-यांनी जकात लागणार नाही अशा भरात होते. १९ दिवस बंद ठेवला. तरीही ठेकेदार नेमला. ठेकेदारबाबत तक्रारी आहेत. तरीही प्रशासनाने कार्यवाही केली नाही. पैसे घेउन ठेका दिला असे व्यापारी व नागरिकांमध्ये बोलले जात होते. त्यावेळी खुलासा केला नाही. जादा पारगमनबाबतही प्रशासनाने तपासणी केली परंतु काही कर्मचा-यांनीच त्यांना पूर्ण कल्पना दिली होती. त्यामुळे काही सापडले नाही.

यामध्ये व्यापा-यांचे नांव करुन ठेकेदाराचे हित पाहिले जात आहे हे बरोबर नाही. नुकसानीचा जो तक्ता दाखवला त्यामध्ये ४०% दाखवले ते योग्य नाही. तुटीबरोबरच वाढ का दाखवली नाही.पुर्वी २७ लाख लिटर डिझेल येत होते  ते ८ लाख लिटर्स येत आहे. दर कमी केल्यामुळे आवक वाढेल त्यामुळे वाढणारे उत्पन्न का गृहीत धरले नाही. हे सर्व ठेकेदाराचे हितासाठी प्रशासनाने केले आहे. तक्त्यामध्ये काहीही बदल केलेला नाही. बैठकही ज्या दिवशी झ ाली त्याच दिवशी ठेकेदाराने तक्ता दिला.

नोव्हेंबर ०५ मध्ये झालेल्या सर्वेप्रमाणे भाजीपाला व दुधापोटी उत्पन्न ३६ लक्ष होते असा तक्ता मनपाने मला दिला आहे. आता ८१ लक्ष कसे झाले? जकात अभिकर्त्यास दिलेल्या सुटीबाबत माझा विरोध आहे. (याबाबतचे पत्र वाचून दाखवले) भाजीपाला व दुधावरील ८१ लाखाची सुट देणे योग्य नाही. यास माझा विरोध आहे. कमी केलेल्या जकात दरापोटी पारगमनचे दर वाढवून दिले असतांनाही ठेकेदाराची तुट कशी आली.

मा.आयुक्त यांनी यावर खुलासा केला की, सर्व वस्तुस्थितीचा विचार करुनच कर्मचा-यांमार्फत अभ्यास करुन रक्कम काढलेली आहे. ४ महिन्यातही उत्पन्न कमी होउ शकते. हा प्रस्ताव आहे. तो तुमच्यापुढे ठेवला आहे.

यावर मा.गिरवले यांनी सांगितले की, दुध व भाजीपाला यावर ८१ लाख कबुल केले आहेत. त्याला लेखी नाही ठराव नाही, कशाला देता. सर्व पदाधिकारी यांच्या भूमिकेमुळे कमी करतो असे तो म्हणाला आहे.

मा.आयुक्त यांनी यावर खुलासा केला की दर पत्रकात दर मंजूर आहेत. त्याचे उत्पन्न गृहीत धरुन ठेका भरलेला होता. ठरावात पारगमनचे दर वाढवावेत असे ठरले होते. यावर मा.गिरवले यांनी ८१.९० लाख कशाचे आधारे ठरवले असे विचारले. यावर मा.आयुक्त यांनी सर्व्हे केल्याचे सांगितले. यावर मा.गिरवले यांनी सांगितले सर्व्हेसाठी ६० कर्मचारी नेमले होते. १० दिवसाचे माहितीमध्ये दुधावर ३१ लाख व भाजीपाला यावर ४ लाख असे एकूण ३५ लाख जकात गृहीत धरली होती. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, ऑफिस अभिलेख आपण पाहू शकता. दुधाचा खप हॉटेल यांचा वापर याचा सर्व विचार करुन सर्व्हे केला आहे.

१६) मा.श्री.अभय आगरकर - २५% वाढ करुन दयावी असा प्रस्ताव मी मांडला होता. येणारी तुट दुध भाजीपाला जकात माफ होती. १५ ते २०% वाढवून दयावे असे ठरले होते. हा कम्युनिकेशन गॅप आहे संभ्रम आहे. निर्णय घेताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे आवश्यक होते. तसे न झाल्यास संशयाचे वातावरण निर्माण होते. यापुढे असे प्रकार घडू नयेत. दोन्ही सर्व्हे मधील परिस्थितीत झालेल्या बदलाबाबत प्रसिध्दी देणे आवश्यक होते. १ जुन पासून सुधारीत दर लागु करण्यात यावेत.

जकात अधिक्षक यांनी खुलासा केला की, जकात अभिकर्त्याने केलेला सर्व्हे मान्य नव्हता. म्हणून त्यामुळे पुन्हा सर्व बाजूने विचार करुन सर्व्हे करण्यात आला.

१७) मा.श्री.कैलास गिरवले - व्यापा-यांना पुढे करुन ठेकेदाराचे हित पाहिले. कमी करावयाच्या रकमेबाबत माझा विरोध आहे.

१८) मा.श्री.शंकरराव घुले - आरोप प्रत्यारोप होताना काही गोष्टी खटकतात. झाडे लावा झाडे जगवा महाराष्ट्र शासनाचे आदेश असताना जकात माफ व्हावयास पाहिजे होती. परंतु रोपांचा व्यवहार होत असेल तर जकात लावावयासच पाहिजे. ठेकेदाराने पैसे वाटले हे सुध्दा म्हणणे चुकीचे आहे. मा.महापौर यांनी खुलासा केला की, झालेले आरोप चुकीचे आहेत. ३३ कोटीचे टेंडर ४०.४१ कोटीला गेले. त्यात महानगरपालिकेचा फायदाच आहे. यानंतर मा.घुले यांनी सांगितले पाणीपट्टी घरपट्टी ठराव मांडला असता तो का मान्य केला नाही? तुटीविषयी प्रशासन फकत भूमिका मांडते.

आपण ठराव करतो. प्रशासन नाही. ८-११ ला मांडलेल्या प्रस्तावात मा.गिरवले यांनी भाषण केले होते. त्यातही शेतक-यांच्या माफीचा ठराव मांडला होता. त्यावर मा.गिरवले यांनी

सांगितले हा ठराव अंमलात आणलेला नाही. मा.महापौर यांनी सांगितले या ठरावाचे मा.आयुक्तांनी पालन केले नाही.

यावर मा.घुले यांनी सांगितले की, नगरपालिका जकात वसुल करत असताना अनेक टोळया तयार झालेल्या होत्या. नगरसेवकासह काही लोक त्यात सामील होते. त्यावेळी नगरसेवकांनी नाके वाटून घेतलेले होते. आता ठेका दिलेला आहे. हे  चांगले काम झाले आहे. शहराची बाजारपेठ यापुढेही कार्यरत रहाण्यासाठी या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

१९) मा.श्री.सुरेश शेळके - प्रशासनाने मांडलेला विषय मंजूर. या सभेत प्रस्ताव प्रोसिडींग कायम करण्यात यावे.

२०) मा.श्री.चोपडा - मा.शेळके यांनी मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन देतो.

२१) मा.श्री.नितीन जगताप  - या ठरावास आम्ही मंजुरी दिली आहे. पण मा.आयुक्तांचे काय म्हणणे आहे. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, सदरचा प्रस्ताव कार्यालयाने मांडलेला आहे. त्यास सहमती आहे.

२२) मा.श्री.अभय आगरकर - मनपाने सर्व्हे केल्यानंतर पहिल्या सर्व्हेतील त्रुटी भरुन काढल्या असत्या तर बरे झाले असते. जे उत्पन्न धरले त्यात निगोशिएशन होत असेल तर त्यात काही अडचण आहे काय हे पाहिले काय? त्यावर मा.आयुक्त यांनी सांगितले पूर्ण प्रस्ताव अभ्यास करुन मांडला आहे.

शेवटी मा.महापौर यांनी सांगितले की, सर्व सदस्यांनी अभ्यास करुन या प्रस्तावावर मुद्दे मांडले आहेत. ३३ कोटीचा ठेका ४०.४१ कोटीला गेला होता. त्यात महानगरपालिकेचे हितच पाहिले गेले. त्यामध्ये वेळीवेळी आलेले वाईट अनुभव आम्ही मा.आयुक्त यांच्या कानावर घातले. तथापी जादा दर असल्यामुळे सर्व जण तक्रारी करीत होते. पैशाअभावी कामे होत नव्हती. इतर मनपाचे तुलनेत आपण मंजूर केलेले दर शासनाने मंजूर केलेले होते. आताही जे दर ठरविण्यात आले आहेत ते मंजूर करुन उदयापासून दर आकारण्याची मंजुरी दयावी अशी विनंती केली. यावर मा.आयुक्त यांनी सदरबाबतचा अंतिम ठराव त्वरीत मिळाल्यास त्याची अंमलबजावणी आज रात्रीपासून केली जाईल, असे सांगितले. त्याचप्रमाणे सदरच्या विषयाचे इतिवृत्त याच सभेत कायम करण्यात येत आहे. असे मा.महापौर यांनी सांगितले व त्यानंतर चर्चा समाप्त झाली.

--*--

ठराव :  ऑफिस रिपोर्ट मंजुर, खर्च मंजुर. सदरचे नविन दर कर दि.१ जुन २००६ पासुनच लागु करावेत. जकात अभिकर्त्याशी नविन सहमतीचा करार त्वरित करावा. नियमानुसार पुढील कार्यवाही सत्वर करावी. तसेच सदरचा विषय हा याच सभेमध्ये कायम करण्यांसही मंजुरी देण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.सुरेश शेळके.

अनुमोदक :  मा.श्री.अभय आगरकर.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.